महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर**

बुरुडगाव रोड,अहमदनगर ४१४००१

दूरध्वनी क्र. ०२४१-२३६१९२ | Email: office.gpnagar@dtemaharashtra.gov.in | Web: www.gpnagar.ac.in

जावक क्रमांक: 1739 दिनांक 07 AUG 2026

# शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर

## प्रथम वर्ष पदविका व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम

## प्रवेश अधिसूचना

## अतिरिक्त प्रवेश फेरी सन २०२६-२७

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम प्रवेश माहिती पुस्तिका २०२६-२७ (नियम क्र. १३ व १५) नुसार **प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी** अभ्यासक्रमाकरिता संस्थेच्या स्तरावर समुपदेशनाद्वारे खालीलप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

| अ.क्र. | प्रवेशाचे वर्ष | दिनांक | अर्ज नोंदणीची वेळ |
|---|---|---|---|
| १ | **प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी (First Year Diploma Engineering)** | ११/०८/२०२६ | सकाळी ०९.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत |
| २ | **थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी (Direct Second Year Diploma Engineering)** | ११/०८/२०२६ | सकाळी ०९.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत |

**१.**सदर प्रवेश प्रक्रियेत हजर होण्याच्या दिनांकापर्यंत www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर CAP व NON-CAP नोंदणी केलेली आहे असे सर्व विद्यार्थी या फेरीसाठी पात्र समजण्यात येतील.

**२.**सदर प्रवेशासाठी उपरोक्त नमूद दिनांकास व वेळेत संस्थेत प्रत्यक्ष हजर राहून अर्ज जमा करावा. या दिवशी दुपारी ०१.०० वाजेनंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी केलेली आहे व प्रत्यक्ष फेरीच्या दिवशी विहित वेळेत उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता यादी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**३.**सदर प्रवेश फेरीत नियमानुसार प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना त्याच दिवशी, म्हणजेच दि. ११/०८/२०२६ रोजी (प्रथम वर्ष) व दि.११/०८/२०२६ रोजी (थेट द्वितीय वर्ष), संस्थेत प्रवेश निश्चित करावा लागेल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश शुल्क व आवश्यक मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे सोबत आणावीत. प्रवेश शुल्काची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**४.**रिक्त जागांची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर (www.gpnagar.ac.in) उपलब्ध करण्यात येईल.

**५.**उपरोक्त नमूद प्रवेश फेरीनंतर जागा रिक्त राहिल्यास/झाल्यास प्रवेश प्रक्रियेसाठी वरील सूचनांप्रमाणे व त्याच वेळेनुसार दि. १३/०८/२०२६ रोजी व दि. १४/०८/२०२६ रोजी प्रथम वर्ष पदविका व थेट द्वितीय वर्ष प्रवेश पदविका प्रक्रियेसाठी संस्थास्तरावर समुपदेशनाद्वारे पुनःप्रवेश फेरी राबविण्यात येईल.

**६.**अधिक माहितीसाठी संपर्क – (वेळ : सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत)
प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी – डॉ.मनोज रोकडे – ९४२३५५४८२१
थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी –श्री.अमितकुमार बैस –९४२१८३०४५३

(डॉ. अजय मधुकरराव आगरकर )
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर